# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(पोलीस भरती सुचना)

**दिनांक २४.०४.२०२६ शुक्रवार**

**पोलीस शिपाई भरती २०२४—२०२५ संबंधाने लेखी परीक्षेस पात्र उमेद्‌वारांना सर्वसाधारण सुचना:—**

पोलीस आयुक्तालय नागपूर शहर यांचे आस्थापणेवरील पोलीस भरती २०२४—२०२५ मधील पोलीस शिपाई यांची एकुण ५९५ पदे भरणेबाबत पोलीस आयुक्त कार्यालय मार्फतीने दिनांक २८.१०.२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील पदांचे भरती प्रक्रीये दरम्यान लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेद्‌वारांची लेखी परीक्षा ही नागपूर शहरातील १) रायसोनी महाविद्यालय, मंगळवारी बाजार चौक, सदर, नागपूर, २) रामदेवबाबा विद्यापीठ व अभियांत्रिकी महाविद्यालय, रामदेवबाबा टेकडी, गिट्टीखदान पोलीस ठाणे मागे, काटोल रोड, नागपुर ३) तुळशीराम गायकवाड पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मोहगाव, वर्धा रोड, नागपुर ४) सेंट फ्रान्सीस डी सेल्स (एस.एफ.एस. महाविद्याालय), बालोद्यान गार्डन समोर, सेमिनिरी हिल्स, नागपूर अशा वेगवेगळ्या ठिकाणी दिनांक २६.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजीत करण्यात आली आहे.

**लेखी परीक्षेकरीता पात्र उमेद्‌वारांना सर्वसाधारण सुचना :—**

**करावे (Do’s) :—**

१) उमेद्‌वारांनी केंद्रावर प्रवेश करतांना त्यांचेजवळ मैदानी चाचणीचे वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र असे दोन्ही प्रवेशपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच, स्वत:ची ओळख पटविण्याकरीता आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हींग लायसन्स), किंवा रंगीत फोटो असलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक साक्षांकीत प्रत सोबत आणावी.

२) उमेद्‌वारांनी त्यांचे प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेल्या फोटोच्या, पासपोर्ट साइज आकाराचे दोन प्रती सोबत बाळगणे आवश्यक आहे.

३) उमेद्‌वारांनी परीक्षा केंद्रावर आपले बायोमेट्रीक नोंदवावी.

४) उमेद्‌वारांनी सोबत आणलेली बॅग ही परीक्षा वर्गाच्या बाहेरच ठेवावी. त्यामधील वस्तु, सामानाची सर्वस्वी जबाबदारी ही उमेद्‌वाराची राहील.

५) उमेद्‌वारांना परीक्षा केंद्रावर दोन तासापुर्वी प्रवेश दिला असल्याने, त्यांनी ३० मिनीटांपुर्वी परीक्षा केंद्रातील वर्गामध्ये आपल्या आसन क्रमांकावर हजर राहावे.

६) लेखी परीक्षा ही केवळ ९० मिनीटांची असल्याने कोणताही उमेद्‌वार परीक्षा केंद्राच्या बाहेर जाणार नाही.

**करू नये (Dont’s):—**

१) उमेद्‌वारांना बॉल पेन व लेखनासाठी पॅड उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने, त्यांनी ईतर कोणतीही वस्तु उदा. पेन, पेन्सील, खोडरबर परीक्षा केंद्रावर सोबत बाळगु नये.

२) परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मायक्रो कॅमेरा डिवाईस, कॅलक्युलेटर, डिजीटल नोटपॅड, ईअरफोन, हिअरींग अॅड डिवाईस, स्मार्ट वॉच, स्मार्ट आयग्लास, बटन कॅमेरा, पेन कॅमेरा व नोट्स पुस्तके इ. साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे.

**स्वा/—**

**( दिपक अग्रवाल )**
**पोलीस उप आयुक्त,**
**पोलीस मुख्यालय,**
**नागपुर शहर.**